पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ह क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी - ३४

जा.क्र. हक्षे / १० / कावि / ५८ / २०१८

दिनांक - २७ / ०४ / २०१८

प्रति,

मा. ...............................................
सदस्य / सदस्या, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी, पुणे – ४११ ०३४

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासीक सभा गुरुवार दिनांक ०३ / ०५ / २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "ह" प्रभाग समितीची मासीक सभा गुरुवार दिनांक ०३ / ०५ / २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहात" आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपली विश्वासू,

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ह प्रभाग समिती मासीक सभा

<u>कार्यपत्रिका क्रमांक - २</u>

दिनांक - ०३ / ०५ / २०१८ वेळ. दुपारी १२.०० वा.

........................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह प्रभाग समितीची मासीक सभा गुरुवार दि. ०३/०५/२०१८ रोजी दुपारी १२.०० बाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे “पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहात” आयोजित करणेत आली आहे. सदर सभेस खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र.९ ) चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक २६/०४/२०१८ रोजी झालेल्या स्विकृत सदस्य निवड सभेचा ( कार्यपत्रिका क्र.१० ) चा सभावृत्तांत कायम करणे.

क) दिनांक २७/०४/२०१८ रोजी झालेल्या सभापती निवड (कार्यपत्रिका क्र.१) चा सभावृत्तांत कायम करणे

विषय क्र.१) प्रभाग क्र.३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी, मुख्य रस्त्यालगत मुंबई –पुणे हायवे महिला स्वच्छतागृह बांधणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) प्रभाग क्र.३० दापोडी गुलाबनगर येथे जुने बंद (संडास) टॉयलेट च्या जागेवर नविन सांस्कृतिक भवन व व्यायामशाळा (डबलमजली ) बांधणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) प्रभाग क्र. २० मधील पूर्वीच्या फिलिप्स कंपनीच्या चौकात कॉ. चटर्जी यांचा पुतळा उभारलेला आहे. त्या चौकाला “कामगार नेते शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी चौक” असे नांव देणेस, शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी यांच्या पुतळयापासून कामत कॉम्प्लेक्स या रस्त्याला “देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस” असे नाव देणेस, शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी यांचा पेप्को फौंड्री कंपनीजवळ अपघात झाला त्या ठिकाणी चौथरा उभारुन सुशोभिकरण करणेस, शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी पुतळयाजवळ कायमस्वरुपी पाणी आणि लाईटची सोय करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) मा.सभापती यांचे परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

प्रशासन अधिकारी

तथा

सचिव (सभाशाखा)

ह प्रभाग समिती

जा.क्र. हक्षे / १० / कावि / ५८ / २०१८

दिनांक - २८ / ०४ / २०१८